





# गणित पूरक पुस्तिका भाग – 1

**इयत्ता :- 6 वी**

**नाव :** ____________________

**इयत्ता :** ____________________

**शाळा :** ____________________

## पूरक पुस्तिके बाबत

- गणित पूरक पुस्तिका भाग -1 आणि 2 मध्ये इयत्ता ६ वीच्या गणित विषयाच्या पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्यावर सराव दिलेला आहे.
- या पूरक पुस्तिकांची रचना ही घटकांची पूर्व तयारी, उजाळणी आणि स्वयं चाचणी अशा पध्दतीने करण्यात आलेली आहे.
- पाठ्यपुस्तिकेत दिलेला सराव आणि पूरक पुस्तिकेमधील सराव हा एकसारखाच आहे.
- या सरावांचा उपयोग शिक्षक विद्यार्थ्यांना गृहपाठ देण्यासाठी, पुढील पाठाची तयारी म्हणून किंवा प्रारंभिक मूल्यमापन करण्यासाठी करू शकतात.

## महत्वपूर्ण सूचना

- विद्यार्थ्यांनी धडा वर्गात शिकविण्यापूर्वी “उजळणी” मध्ये दिलेल्या प्रश्नांचा सराव करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास धडा शिकण्यासाठी आवश्यक असलेल्या पूर्व ज्ञानाचा सराव उपलब्ध करुन देतो.
- विद्यार्थ्यांनी धडा वर्गात शिकविल्यानंतर “घटकावर आधारित सराव” यामध्ये दिलेल्या प्रश्नांचा सराव करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास घटकांवर आधारित प्रश्नांच्या सरावासाठी उपयुक्त आहे.
- विद्यार्थ्यांनी धडा वर्गात शिकविल्यानंतर “स्वयं चाचणी” यामध्ये दिलेल्या प्रश्नांचा सराव करणे अपेक्षित आहे. हा अभ्यास घटकाची समज लक्षात येण्यासाठी मदत करेल.
- विद्यार्थ्यांनी आपल्या सराव पूर्ण झाल्यानंतर, प्रश्नांची उत्तरे आपल्या वर्गशिक्षकांकडून तपासून घ्यावीत.
- विद्यार्थ्यांना सरावा दरम्यान काही अडचणी अल्यास शिक्षक / पालक / सहाध्यायी गट सदस्यांकडून मदत घेण्यास हरकत नाही.
- या पुस्तिकांच्या संगणकीय प्रत मिळविण्यासाठी, विद्यार्थी सोबत दिलेला क्युआर कोड स्कॅन करु शकतात. त्याचबरोबर http://sikshana.org/fln.html लिंकवर क्लिक करुन देखील मिळवू शकतात.
- क्युआर कोड स्कॅन करण्यासाठी स्मार्टफोनवर गुगल लेन्स किंवा अन्य स्कॅनिंग ॲप्लिकेशनचा वापर करु शकता.

‘‘आम्ही ही पुस्तिका निर्माण करत असताना आशया संदर्भातील त्रुटी आणि टंकलेखनातील त्रूटी कमी करण्याचे सर्व प्रयत्न केले आहेत. तथापि, तुम्हाला काही चूक आढळल्यास किंवा या पुस्तिकांची उपयोगिता सुधारण्यासाठी आपल्या काही सूचना असल्यास, कृपया संपर्क साधावा. आपण आपल्या सूचना आम्हाला खालील ई-मेल आयडीवर पाठवू शकता.’’

feedback@sikshana.org

## अनुक्रमणिका


| अनु. क्र. | घटक | पान क्रमांक |
|---|---|---|
| 1. | भूमितीतील मुलभूत संकल्पना | 1 - 6 |
| 2. | कोन | 7 - 11 |
| 3. | पूर्णांक संख्या | 12 -17 |
| 4. | अपूर्णांकावरील क्रिया | 18 - 23 |
| 5. | दशाशं अपुर्णांक | 24 - 28 |
| 6. | स्तंभालेख | 29 - 34 |
| 7. | सममिती | 35 - 39 |
| 8. | विभाज्यता | 40 - 43 |
| 9. | मसावि - लसावि | 44 - 48 |

Date: ___/___/___

# भूमितीतील मुलभूत संकल्पना

**उजळणी**

1) क्रमाने येणारा पुढचा आकार कोणता असेल?


____________________

2) चेहऱ्याचा आकार पूर्ण कर.




3) गटात न बसणाऱ्या आकाराला गोल कर.


a) 

b) 


4) क्रमाने येणारा पुढचा आकार काढ.


____________________

5) डावीकडील आकृतीमध्ये प्रत्येक चौकोनामध्ये विशिष्ट आकृतीबंध दाखविला आहे. तर, रिकाम्या चौकोनात उजवीकडे दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय योग्य असेल त्यावर बरोबरची ☑ खूण कर.




6) डावीकडील आकृतीमध्ये प्रत्येक चौकोनामध्ये विशिष्ट आकृतीबंध दाखविला आहे. तर, रिकाम्या चौकोनात उजवीकडे दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय योग्य असेल त्यावर बरोबरची ☑ खूण कर.




Date: ___/___/___


7) खालील ठिपके जोड आणि कोणताही एक आकार तयार कर.




8) खाली दिलेल्या आकारांच्या जोड्या जूळव.



9) प्रश्नचिन्ह दाखविलेल्या डावी कडील आकृतीमध्ये कोणता आकार येईल ते दिलेल्या पर्यायांमधून निवड आणि त्यावर बरोबरची ☑ खूण कर.




10) खालील आकारांच्या जोड्या लाव.



11) मोजपट्टीचा वापर करुन कोणताही आकार काढ.


12) खाली दिलेले अंक जोड आणि पक्ष्याचे नाव सांग.

उत्तर: ______________________




Date: ___/___/___

13) क्रमाने येणारा पुढील आकृतीबंध काढ.




________________

14) क्रम पूर्ण कर.



________________


15) रिकाम्या जागांवर क्रमाने येणारे आकार काढ.




________ ________ ________ ________

## घटकावर आधारित प्रश्न

1) खालील रिकाम्या चौकटींत 'छेदणाऱ्या रेषा' किंवा 'समांतर रेषा' यांपैकी योग्य तो पर्याय लिही.



शेजारील आकृतीवरून नावे लिही. (प्रश्न 2 ते 5)




2) एकरेषीय बिंदू ________________

3) किरण ________________

4) रेषाखंड ________________

5) रेषाखंड ________________

6) शेजारील रेषेची वेगवेगळी नावे लिही.





उत्तर: ________________________________

Date: ___/____/____

7) जोड्या लाव.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i)  | a) किरण |
| (iii)  | b) प्रतल |
| (iii)  | c) रेषा |
| (iv)  | d) किरण |

खालील आकृतीचे निरीक्षण कर. त्यातील नावे लिही. (प्रश्न क्रमांक 8 ते 10)




8) समांतर रेषा____________________

9) एकसंपाती रेषा ____________________


10) एकसंपाती रेषा व संपात बिंदू ____________________

11) सपाट पृष्ठभाग म्हणजे________________ होय.

12) जेव्हा दोनपेक्षा अधिक रेषा एकाच बिंदूत छेदतात तेव्हा त्या रेषांना____________________ म्हणतात.

13) रेषाखंड AB काढ.

14) खाली दिलेल्या आकृतीमध्ये P, A, T हे काय आहेत?





______________________________

15) कागदावर एक बिंदू काढ आणि मोजपट्टीच्या सहाय्याने बिंदूला छेदून जाणाऱ्या 5 रेषा काढ.

Date: ___/___/___

# स्वयं चाचणी

1) दोन किरणे जी एका समान बिंदूवर भेटतात त्यांना ________________ म्हणतात.



2) काढ आणि नावे दे.

a) रेषा जिच्यावर बिंदू P आहे.

b) R ला छेदून जाणारी रेषा.

3) खालीलपैकी कोणाची लांबी निश्चित आहे?

a) रेषा  b) बिंदू  c) रेषाखंड  d) किरण

4) किरण म्हणजे काय?

a) दोन बिंदू असलेल्या रेषेचा भाग

b) रेषेचा एक भाग आहे. एका बिंदूपासून सुरुवात होऊन तो एकाच दिशेने पुढे पुढे जात राहतो.

c) रेषेचा एक भाग ज्यामध्ये एकही बिंदू नसतो.

d) रेषेचा भाग ज्यामध्ये 3 बिंदू असतात.

5) खाली दिलेली आकृती ही कशाचे उदाहरण आहे?




a) बिंदू  b) किरण  c) रेषाखंड  d) यापैकी नाही.


Date: ___/___/___

6) समातंर रेषा काढ.


7) खाली दिलेल्या आकृतीला किरण काढ.



8) खाली दिलेले बिंदू जोड आणि त्यामध्ये निर्माण होणाऱ्या रेषाखंडाला नाव दे.

a) 

________________

b) 

________________

9) 4 बिंदू जोडून कोणताही आकार काढ.

10) किरणाला अंत असतो. चूक /बरोबर


उत्तर: ______________________________

Date:___/____/____

# कोन

**उजळणी**

1) खालील रेषांपैकी कोणत्या रेषा लंब आहेत?



2) फळ्याच्या विरुद्ध कडा ह्या कोणत्या उदाहरणाचा नमुना आहेत?

a) लंब रेषा  b) समांतर रेषा  c) ओळखता येत नाही

3) जेव्हा दोनपेक्षा अधिक रेषा एकाच बिंदूत छेदतात तेव्हा त्या रेषांना ______________ म्हणतात.

4) रेषाखंड AB काढ.

5) कागदावर एक बिंदू काढ आणि मोजपट्टीच्या सहाय्याने बिंदूला छेदून जाणाऱ्या 2 रेषा काढ.


6) खालीलपैकी कशाची लांबी निश्चित आहे?

a) रेषा  b) बिंदू  c) रेषाखंड  d) किरण


7) किरणाचे उदाहरण म्हणजे?

a) बिंदू  b) सळई / गज  c) सुर्यकिरण  d) वर्तुळ

8) खाली दिलेले बिंदू जोड आणि त्यामध्ये निर्माण होणाऱ्या रेषाखंडाला नाव दे.


a) 


______________

b) 


______________

9) तोंडाचा आकर काय दर्शवितो?






a) वक्र  b) किरण  c) रेषा  d) बिंदू

Date:___/___/___


## घटकांवर आधारीत प्रश्न

1) खालील सारणी पूर्ण कर.

| कोन |  |  |  |
|---|---|---|---|
| कोनाचे नाव | | | |
| कोनाचा शिरोबिंदू | | | |
| कोनाच्या बाजू | | | |


2)  हे उदाहरण______________ कोनाचे उदाहरण आहे.

3) कोनाचे नाव लिही.




उत्तर:____________________

4) कोनाचे नाव लिही.




उत्तर:____________________

5) कोनाचे नाव लिही.



उत्तर:____________________

6) कोनाचे नाव लिही.




उत्तर:____________________

7) जोड्या लावा.

| कोनाचे माप |
|---|
| (1) 180° |
| (2) 240° |
| (3) 360° |
| (4) 0° |

| कोनाचे प्रकार |
|---|
| शून्य कोन |
| सरळ कोन |
| प्रविशाल कोन |
| पूर्ण कोन |

Date:____/____/____


8) खाली काही कोनांची मापे दिली आहेत. त्यावरुन कोनाचे प्रकार लिही.


a) $75^0$ ________________ d) $148^0$ ________________

b) $215^0$ ________________ e) $0^0$ ________________

c) $180^0$ ________________ f) $360^0$ ________________

9) खाली दिलेले आकार पहा आणि त्यावरुन कोनाचा प्रकार लिही.

a)  उत्तर:________________

b)  उत्तर:________________

10) कोनमापकाचा वापर करुन लघुकोन, काटकोन व विशालकोन काढ.

11) $30^0$ चा कोन काढण्यासाठी एक कोन दुभाजक तयार कर.

12) कंपासपेटीतील साहित्याचा वापर करुन खालील कोन काढ. कंपास आणि मोजपट्टी वापरुन कोनदुभाजक काढ.

a) $50^0$ b) $115^0$

Date: ____/____/____

13) abc असा कोणताही कोन आणि कोनदुभाजक काढ.

उत्तर:

14) ____________________ हा कोन $180^0$ पेक्षा मोठा कोन आहे.

15) ____________________ हा कोन $90^0$ पेक्षा मोठा आणि $180^0$ पेक्षा लहान कोन आहे.


**स्वयं चाचणी**

1) $360^0$ कोन काढ.

2) एक प्रविशाल कोन काढ.


3) कोनमापकाच्या साहाय्याने कोन मोज, आणि तो लघूकोन आहे, काटकोन आहे की विशालकोन आहे ते लिही.

1.




____________________

2.



____________________


3.



____________________

Date: ___/___/___

4) घड्याळातील वेळेवर आधारित कोन शोध आणि लिही.



__________ __________ __________ __________

5) जेंव्हा __________________ तेंव्हा कोन तयार होतो.

a) एक रेषा वाढवली जाते. b) दोन रेषा एकमेकांना छेदतात. c) दोन रेषा समांतर असतात.

6) $70^0$ कोन काढ आणि कोनाला नाव दे.

7) पूर्ण कोनाचे माप ______________ असते.

Date: ___/___/___

# पूर्णांक संख्या

## उजळणी

1) क्रम पूर्ण कर.

a) 1 11 2 12 3 13 __________ __________

b) 10 6 20 12 30 18 __________ __________

2) रिकाम्या जागी योग्य संख्या लिही.

(53) (58) (63) ( ) (72) (78) ( )

3) अचूक उत्तर शोध. 130 + 67 - 55 x 2 __________

(a) 87 (b) 156 (c) 284 (d) 100

4) पूर्ण संख्यांची बेरीज ओळख __________आहे.

(a) 1 (b) 3 (c) 0 (d) 10

5) रिकाम्या जागेवर कोणत्या संख्या येतील ते शोध. (सूचना- वरची संख्या खालील संख्यांची बेरीज आहे.)

| | | |
|---|---|---|
| | ( ) | |
| 300 | 700 | |
| 100 | | |

6) एका वर्गात प्रत्येक ओळीत 25 खुर्च्या असलेल्या 8 ओळी आहेत. तर वर्गात किती खुर्च्या आहेत?

7) 235 मधून 998 वजा केल्यानंतर उत्तर __________ हे असेल.

8) उत्तर शोध. 56 X 4 + 4 X 56 = __________

Date: ___/___/___

9) रिकाम्या जागी कोणती संख्या शोध आणि लिही.

[ ]

689 __ 310

10) 5 x 12 गुणाकार काय असेल. __________

11) दिलेल्या संख्येची जवळची दशमान संख्या लिही.

(a) 48 ____________________ (b) 59 ____________________


12) संख्या अक्षरात लिही.

(a) 8712 = ______________________________________________

(b) 981 = ______________________________________________

(c) 555 = ______________________________________________

13) एकूण स्टार्सची संख्या किती आहे?



= ____________________

14) खालील समीकरणे सोडव.

(a) 45 + 34 - 12 x 3 = ______________________________

(b) 88 -12 + 12 x 2 = ______________________________

15) उलटी गिनती करुन रिकाम्या जागा भर.

(a) 55 [ ] [ ] [ ] [ ] [ ] 49

(b) 106 [ ] [ ] [ ] [ ] [ ] 100

Date: ___/___/___

## घटकावर आधारित प्रश्न

1) धन संख्या, शून्य व ऋण संख्या मिळून संख्यांचा जो समूह तयार होतो त्याला ____________ म्हणतात.

2) संख्यारेषेवर -7 व +8 या संख्या दाखव.

3) खाली दिलेल्या संख्यांचे धन संख्या आणि ऋण संख्या असे वर्गीकरण कर.

-5, +4, -2, 7, +26, -49, -37, 19, -25, +8, 5, -4, -12, 27

धन संख्या ________________________________

ऋण संख्या ________________________________

4) खाली काही शहरांचे तापमान दिले आहे. चिन्हांचा वापर करून त्यांचे लेखन करा.

| स्थान | सिमला | लेह | दिल्ली | नागपूर |
|---|---|---|---|---|
| तापमान | $0^0$ च्या खाली $7^0C$ | $0^0$ च्या खाली $12^0C$ | $0^0$ च्या वर $22^0C$ | $0^0$ च्या वर $31^0C$ |

सिमला ___________ लेह ___________ दिल्ली ___________ नागपूर ___________

खालील उदाहरणातील संख्या, चिन्हांचा उपयोग करून लिही. (प्रश्न 5 ते 8)

5) एक पाणबुडी समुद्रसपाटीपासून 512 मीटर अंतर खोलीवर आहे.

________________________________________________

6) हिमालयातील सर्वांत उंच शिखर माउंट एव्हरेस्टची उंची समुद्रसपाटीपासून 8848 मीटर आहे.

________________________________________________


7) जमिनीपासून 120 मीटर अंतरावर उडणारा पतंग.

________________________________________________

8) भुयार जमिनीखाली 2 मीटर खोल आहे.

________________________________________________


9) संख्यारेषेचे निरीक्षण कर आणि चौकोनामध्ये योग्य संख्या भर.




प्रथम ससा ______ क्रमांकावर होता ______ त्याने ______ एककाची उडी उजवीकडे मारली.

आता तो ______ संख्येवर पोहोचला.

10) संख्यारेषेचे निरीक्षण कर आणि चौकोनामध्ये योग्य संख्या भर.




प्रथम ससा ______ क्रमांकावर होता ______ त्याने ______ एककाची उडी उजवीकडे मारली.

आता तो ______ संख्येवर पोहोचला.

11) खाली दिलेली सारणी पूर्ण कर.

| + | 8 | 4 | -3 | -5 |
|---|---|---|---|---|
| -2 | -2 + 8 = + 6 | | | |
| 6 | | | | |
| 0 | | | | |
| -4 | | | | |

Date: ___/___/___

12) खाली दिलेल्या संख्यांच्या विरुद्ध संख्या लिही.

| संख्या | 47 | +52 | -33 | -84 | -21 | +16 | -26 | 80 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विरुद्ध संख्या | | | | | | | | |

13) खालील चौकटीत यांपैकी योग्य चिन्ह लिही. > , < , =

| | | | |
|---|---|---|---|
| (1) -4 ☐ 5 | (2) 8 ☐ -10 | (3) +9 ☐ +9 | (4) -6 ☐ 0 |
| (5) 7 ☐ 4 | (6) 3 ☐ 0 | (7) -7 ☐ 7 | (8)-12 ☐ 5 |
| (9) -2 ☐ -8 | (10)-1 ☐ -2 | (11) 6 ☐ -3 | (12)-14 ☐ -14 |

14) पहिल्या स्तंभातील संख्यांमधून वरच्या ओळीतील संख्या वजा कर आणि प्रत्येक रिकाम्या चौकोनात योग्य संख्या लिही

| - | 6 | 9 | -4 | -5 | 0 | +7 | -8 | -3 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 3 - 6 = -3 | | | | | | | |
| 8 | | | | 8 - (-5) = 13 | | | | |
| -3 | | | | | | | | |
| -2 | | | | | | | | |

15) दोन विरुद्ध संख्यांची बेरीज असते.

**स्वयं चाचणी**

1) आकृतीबंध पूर्ण कर .

a) -2, -4, -6, - 8, ____, ____, ____ .  b) 15, 10, 5, 0, ____ , ____ , ____ .

2) रिकाम्या जागा भर.

a) सर्व ऋण पूर्णांक संख्या शून्यापेक्षा ________ असतात.

b) सर्व धन पूर्णांक संख्या शून्यापेक्षा ________ असतात.

3) शुन्य ही पूर्णांक संख्या आहे. (चूक, बरोबर)

उत्तर= ________________

Date: ___/___/___

4) 100 ही 10 पेक्षा मोठी संख्या आहे. (चुक / बरोबर)

उत्तर= ______________________________

5) रिकाम्या जागी येणारी संख्या शोध.

a) (-2)+(-4) +________ = 3

b) (-1)+(-1) +________ =-7

6) फरक शोध.

a) 16 -15 = ________

b) (-18)-(-8) = ________

7) एक माकड एका झाडावरुन दुसऱ्या झाडावर उड्या मारत आहे. खाली झाडांवर काही संख्या दिलेल्या आहेत. संख्यांचे निरिक्षण कर आणि संख्या रेषेवर दाखव.




8) खालीलपैकी कोणता अंक हा -1 पेक्षा मोठा आहे?


(a)-2 (b)-10 (c) 0 (d) -3

9) खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.

(a) 2 मधून (-3) वजा केल्यास 1 मिळतो. उत्तर= ____________________

(b) (-1) मधून (-6) वजा केल्यास 6 मिळतात. उत्तर= ____________________

10) रिकाम्या जागचा अंक शोध.




Date: ___/___/___

# अपूर्णांकावरील क्रिया


## उजळणी

1) 10 पेन्सिलची किंमत 90 रुपये आहे, तर एका पेन्सिलची किंमत शोध. एका पेन्सिलची किंमत असेल.



एका पेन्सिलची किंमत ____________________असेल.

2) माकड आणि केळी यांच्या जोड्या जूळव.




3) 5462 ही संख्या 2ने, 3ने आणि 6 ने विभाज्य आहे अथवा नाही हे तपासुन पहा.

होय ____________________ नाही ____________________

4) 80 चे विभाजक शोध.

______________________________________________________________

5) खालील गोलांची 5 गटात विभागणी कर.



एका गटातील गोलांची संख्या = ☐

6) खालील उदाहरणातील बाकी आणि भागाकार लिही.

(a) 563÷8 बाकी __________________ भागाकार __________________

(b) 785÷5 बाकी __________________ भागाकार __________________

7) राजू दिवसाला 5 पुस्तके पूर्ण वाचतो, 30 दिवसांत तो किती पुस्तके पूर्ण करेल ?
उत्तर =

8) वर्गात 50 विद्यार्थी आहेत. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना समान अशा पध्दतीने 250 पुस्तकांचे वाटप करावे. प्रत्येक विद्यार्थ्याला किती पुस्तके मिळाली असतील ?
उत्तर =

9) उदाहरणे सोडव.

8632 ÷ 8

65421 ÷ 13

10) राजूकडे 20 सफरचंद आहेत. त्याने आपल्या 4 मित्रांना ते सफरचंद समान वाटले. तर, प्रत्येक मित्राला किती सफरचंद मिळाले असतील?
उत्तर =

11) रिकाम्या जागेवरची संख्या शोध.

a) 198 ÷ ________ = 33

b) ________ ÷ 9 = 55

c) 45 ÷ 5 = ________

12) लक्ष्मीकडे 80 पेन्सिल आहेत आणि तिला त्या 5 मैत्रिणींना समान वाटायच्या आहेत. तर, प्रत्येक मैत्रिणीला किती पेन्सिल मिळतील?

13) खालील उदाहरणे सोडव आणि संख्या रेषेवर दाखव.

a) (+4) + (-5) = ________________

b) (-8) + (+2) = ________________

Date:____/____/____

14) खालीलपैकी कोणत्या संख्या या 4 ने विभाज्य आहेत? चौकोनात होय किंवा नाही असे उत्तर लिही.

(a) 572 ☐ (b) 21,084 ☐ (c) 34,560 ☐

**घटकावर आधारित प्रश्न**

1) अंशाधिक अपूर्णांकात रुपांतर कर.

a) $7\frac{2}{5}$ = ________________ b) $5\frac{1}{6}$ = ________________

c) $4\frac{3}{4}$ = ________________ d) $2\frac{5}{9}$ = ________________

2) पूर्णांकयूक्त अपूर्णांकात रुपांतर कर.

a) $\frac{30}{7}$ = ____________ b) $\frac{7}{4}$ = ____________

पुढील उदाहरणे अपूर्णांक रुपात लिही. (प्रश्न 3 आणि 4)

3) 9 किलोग्रॅम तांदूळ 5 जणांत समान वाटले, तर प्रत्येकाला किती किलोग्रॅम तांदूळ मिळतील?

4) 5 सारखे शर्ट शिवण्यासाठी 11 मीटर कापड लागते, तर एका शर्टासाठी किती मीटर कापड लागेल?

5) बेरीज कर आणि उतरे लिही

$5\frac{1}{2} + 2\frac{3}{4}$ = ________________

6) वजाबाकी कर आणि उत्तरे लिही.

$3\frac{2}{5} - 2\frac{1}{7}$ = ________________


Date: ___/___/___

खालील उदाहरणे सोडव.


7) सुयशने $2\frac{1}{2}$ किलोग्रॅम आणि आशिषने $3\frac{1}{2}$ किलोग्रॅम साखर आणली, तर दोघांनी मिळून किती साखर आणली ? साखरेचा भाव 32 रुपये प्रतिकिलो असेल, तर साखरेची एकूण किंमत किती ?

8) आराधनाने आपल्या परसबागेतील $\frac{2}{5}$ भागात बटाट्याची लागवड केली. $\frac{1}{3}$ भागात पालेभाज्यांची लागवड केली. उरलेल्या भागात वांग्याची लागवड केली, तर किती भागात वांग्याची लागवड केली ?

9) खालील रेषांवर A व B बिंदू कोणते अपूर्णांक दर्शवतात ते रिकाम्या चौकटींत लिही. ?




10) संख्यारेषेवरील रिकाम्या जागेवरील संख्या शोध.




11) अशोकरावांनी आपल्या 21 एकर शेताच्या $\frac{2}{7}$ भागात केळीची लागवड केली, तर एकूण केळी लागवडीचे क्षेत्र किती ?

12) खालील संख्यांचा गुणाकार व्यस्त लिही.

a) 7 ____________ b) $\frac{11}{3}$ ____________ c) $\frac{5}{13}$ ____________

13) खालील भागाकार कर.

a) $\frac{2}{3} \div \frac{1}{4} =$ ____________________ b) $\frac{5}{9} \div \frac{3}{2} =$ ____________________

Date: ___/___/___

14) स्वच्छ भारत अभियानामध्ये 420 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यांनी सेवाग्राम या गावाचा $\frac{42}{75}$ भाग स्वच्छ केला, तर प्रत्येक विद्यार्थ्यांने सेवाग्रामचा किती भाग स्वच्छ केला?

15) गुळाची प्रत्येक ढेप एक किलोग्रॅमची अशा सहा ढेपा आहेत. एका कुटुंबाला महिन्याला दीड किलो गूळ लागत असेल, तर या ढेपा किती कुटुंबांना पुरतील?

**स्वयं चाचणी**

1) खालील अपूर्णांक संख्या चढत्या क्रमाने लिही.

$\frac{1}{5}$ $\frac{1}{2}$ $\frac{1}{8}$ $\frac{1}{3}$ $\frac{1}{4}$ ______________________

2) साध्या रुपात लिही.

(a) $\frac{1}{4} + \frac{5}{4}$ (b) $\frac{1}{3} + \frac{2}{3}$

3) राणी ने $\frac{1}{4}$ इतके सफरचंद खाल्ले आणि राधा ने $\frac{2}{3}$ सफरचंद खाल्ले. तर दोघींनी मिळून किती सफरचंद खाल्ले. (संख्या मिळवा.)

Date: ___/___/___

4) खालील उदाहरणांमधील P ची किंमत शोध.

a) $\frac{1}{2} = \frac{P}{10}$   b) $\frac{P}{2} = \frac{25}{10}$   c) $\frac{4}{5} = \frac{P}{30}$

P = ______   P = ______   P = ______

5) खालील संख्या उतरत्या क्रमाने लिही.

$\frac{1}{9}$, $\frac{13}{9}$, $\frac{11}{9}$, $\frac{15}{9}$, $\frac{3}{9}$

उतरता क्रम : ____________________________________________

6) खालील अपूर्णांक संख्यांची बेरीज कर.

a) $\frac{1}{2} + \frac{1}{5}$   b) $\frac{1}{3} + \frac{7}{2}$   c) $\frac{1}{2} + \frac{5}{6} + \frac{3}{6}$

उत्तर:__________   उत्तर:__________   उत्तर:__________

7) दिलेल्या अपूर्णांकांच्या जोड्यांमध्ये '<' किंवा '>', '=' या चिन्हांचा वापर कर.

a) $\frac{1}{6}$ ☐ $\frac{1}{3}$   b) $\frac{3}{4}$ ☐ $\frac{2}{6}$   c) $\frac{2}{3}$ ☐ $\frac{2}{4}$



8) अपूर्णांकांचे साध्या रुपात रुपांतर कर.



a) $\frac{7}{28}$ = __________   b) $\frac{15}{90}$ = __________

9) अंशाधिक अपूर्णांक संख्येला गोल कर.

$\frac{2}{7}$, $\frac{7}{11}$, $\frac{9}{11}$, $\frac{13}{2}$, $\frac{7}{3}$

10) दिलेल्या आकृत्यांचे अपूर्णांक शोध आणि त्यांची बेरीज कर. (उदाहरणाचा संदर्भ घे.)

 +  $= \frac{3}{4} + \frac{1}{4} = \frac{4}{4}$ ( = 1)

 +  =

Date: ___/___/___

**दशांश अपूर्णांक**

**उजळणी**

1) 542 ही संख्या 2ने, उ ने आणि 6 ने विभाज्य आहे अथवा नाही हे तपासुन पहा.

होय　　　　　　　　　　नाही



2) खालील गोलांची 3 गटात विभागणी कर.



3) रिकाम्या जागा भर.

(a) एक किलोग्रॅम =__________ ग्रॅम　　　(b) अर्धा किलोग्रॅम =__________ ग्रॅम

4) रिकाम्या चौकटीत गोल भर आणि उदाहरणातील रिकाम्या जागेवर कोणत्या संख्या येतील.

(a) 　　(b) 

7 + _____ = 14　　　　5 + _____ = 14

5) उत्तर शोध.

(a) 321 - 212 =__________　　(b) 555 - 315 =__________

6) राजूकडे 162 पुस्तके आहेत. रामूकडे 331 पुस्तके आहेत. दोघांची मिळून किती पुस्तके आहेत?

162 + 331 = __________

7) शाळेत 3 वर्ग आहेत.

इयत्ता 1 ली मधील विद्यार्थ्यांची संख्या = 345

इयत्ता 2 री मधील विद्याथ्यांची संख्या = 125

इयत्ता 3 मधील विद्याथ्यांची संख्या = 162

शाळेतील एकूण विद्यार्थी संख्या शोधा.

उत्तर:____________________

8) खालील संख्यापैकी लहान संख्या कोणती ते शोध.

001, 100, 110, 101, 111, 011　　　लहान संख्या:____________

Date: ___/___/___

9) सर्वात मोठ्या संख्येला गोल कर.

(a) 999, 381, 100, 981, 467 (b) 11, 111, 1, 121, 222

10) एका पुड्यामध्ये 200 ग्रॅम साखर होती आणि तुम्ही त्यात 451 ग्रॅम साखर घातली तर पुड्यामध्ये एकूण साखर किती असेल?



उत्तर:__________ ग्रॅम

11) दशमाना जवळील संख्या लिही.

a) 73 जवळची दशक संख्या ______________

b) 312 जवळील शतक संख्या ______________

12) कासव 46 मीटर चालले आणि पुन्हा 95 मीटर चालले. तर ते एकूण किती अंतर चालले?

 46 मीटर +  95 मीटर = ________ मीटर

13) उदाहरणाचे निरीक्षण कर आणि उर्वरित चौकोन भर.

| ÷ | 15 | 30 |
|---|---|---|
| 3 | 5 | |
| 5 | | |
| 15 | | |

14) खालील उदाहरणातील बाकी आणि भागाकार लिही.

(a) 563 ÷ 8 बाकी ______________ भागाकार ______________

(b) 785 ÷ 5 बाकी ______________ भागाकार ______________

15) वर्गात 50 विद्यार्थी आहेत. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना समान अशा पध्दतीने 250 पुस्तकांचे वाटप करावे. प्रत्येक विद्यार्थ्याला किती पुस्तके मिळाली असतील?

Date: ____/____/____

## घटकावर आधारित प्रश्न

1) सोडव.

a) 905.5 + 27.197 = ______________ b) 40+ 27.7 + 2.451 = ______________

2) वजाबाकी कर.

a) 85.96 - 2.345 = ______________ b) 200.005 - 17.186 = ______________

तुझी उत्तरे दशांश अपूर्णांकामध्ये लिही. (प्रश्न 3 ते 5)

3) अविनाशने 42 किमी 365 मीटर प्रवास बसने, 12 किमी 460 मी प्रवास मोटारने आणि 640 मीटर प्रवास पायी केला, तर त्याने एकूण किती किमी प्रवास केला?

4) सुजाताने बाजारातून 4.25 किलो वजनाचे कलिंगड आणले. त्यातील 1 किलो 750 ग्रॅम कलिंगड शेजारच्या मुलांना दिले, तर तिच्याकडे किती किलोग्रॅम कलिंगड शिल्लक राहिले?

5) अनिता कारने ताशी 85.6 किमी वेगाने प्रवास करत होती. रस्त्यावर 'कारची वेगमर्यादा ताशी 55 किमी' अशी सूचना होती. तर तिने गाडीचा वेग कितीने कमी केल्यास वहातूकीच्या नियमांचे पालन होईल.

6) खालील संख्या संख्यारेषेवर दाखव.

a) 3.5 b) 1.9 c) 4.2 d) 2.7

7) चौकटीत योग्य संख्या भर.

$\frac{3}{5} = \frac{3 \times \square}{5 \times \square} = \frac{\square}{10} = \square$ $\frac{22}{40} = \frac{11}{20} = \frac{11 \times \square}{20 \times 5} = \frac{\square}{100} = \square$

8) व्यवहारी अपूर्णांकांचे दशांश अपूर्णांकांत रूपांतर कर.

a) $\frac{3}{4}$ = __________ b) $\frac{4}{5}$ = __________ c) $\frac{7}{25}$ = __________

9) खालील दशांश अपूर्णांक व्यवहारी अपूर्णांक रूपात लिही.

a) 27.5 = __________ b) 0.007 = __________ c) 90.8 = __________

d) 39.15 = __________ e) 3.12 = f) 70.400 = __________

10) रिकाम्या जागा भर.

जर 317 × 45 = 14265, तर 3.17 × 4.5 = __________

11) गुणाकार कर.

a) 2.7 x 1.4 = __________ (2) 6.17 x 3.9 = __________ (3) 0.57 x 2 = __________

12) विरेंद्रने 5.250 किग्रॅ वजनाची एक पिशवी याप्रमाणे 18 पिशव्या तांदूळ खरेदी केला, तर एकूण तांदूळ किती खरेदी केला? जर तांदळाचा दर 42 रुपये प्रतिकिग्रॅ असेल, तर त्याने किती रुपये दिले?

13) भागाकार कर.

a) 4.8 ÷ 2 = __________ b) 17.5 ÷ 5 = __________

c) 20.6 ÷ 2 = __________ d) 32.5 + 25 = __________

14) रस्त्याची एकूण लांबी 4 किमी 800 मीटर आहे. रस्त्याच्या दुतर्फावर दर 9.6 मीटर अंतरावर झाडे लावली, तर एकूण किती झाडे लागतील ?

15) प्रज्ञा दररोज नियमितपणे मैदानावरील वर्तुळाकार मार्गावरून चालण्याचा व्यायाम करते. जर ती दररोज 9 फेऱ्यांत एकूण 3.825 किमी अंतर चालते, तर एका फेरीत ती किती अंतर चालते?

Date: ___/___/___

## स्वयं चाचणी

1) खालील उदाहरणांमधील मोठी संख्या कोणती ते शोध.

a) 0.2 व 0.4 b) 70.08 व 70.7 c) 6.6 व 6.58 d) 7.4 व 7.35

__________ __________ __________ __________

2) अभिषेकने 40 किमीचा प्रवास केला. 28 मी. बसने, 2 किमी. 265 मी. कारने आणि उर्वरित 1 किमी. 30 मी. पायी तर त्याने एकूण किती अंतर पार केले?

3) चढत्या क्रमाने लिही.

0.04, 1.04, 0.14, 1.14, 1.004 ______________________________

4) प्रत्येक अधोरेखित अंकाची स्थानिक किंमत लिही.

a) 3<u>4</u>.26 b) 8.8<u>8</u> c) 0.<u>9</u>1

__________ __________ __________

5) खालील अपूर्णांक हे दशांश चिन्हांचा वापर करून दशांश अपूर्णांकात लिही.

a) $\frac{16}{100}$ = __________ b) $\frac{278}{1000}$ = __________ c) $\frac{6}{100}$ = __________

6) दशांशांची बेरीज शोध.

a)

| |
|---|
| 0.34 |
| + 1.43 |
| |

b)

| |
|---|
| 5.74 |
| + 6.23 |
| |

7) दशांश अपूर्णांकांमध्ये लिही.

a) 0.03 b) 0.90 c) 0.0006

8) बेरीज शोध आणि ती संख्या रेषेवर दाखव. 3.5 + 4.8 =__________

9) उतरत्या क्रमाने लिही.

0.05, 2.05, 0.15, 5.14, 1.005______________________

10) खालील दशांश अपूर्णांकासाठी अपूर्णांक लिही.

a) 0.4 =__________ b) 0.2 = __________ c) 0.8 =__________ d) 1.6= __________

Date: ___/___/___

**स्तंभालेख**

**उजळणी**

1) एका वर्गातील 25 विद्यार्थ्यांना चाचणीमध्ये खालील गुण मिळाले.
5, 6, 7, 5, 4, 2, 2, 9, 10, 2, 4, 7, 4, 6, 9, 5, 7, 6, 8, 4, 3, 4, 6, 9, 10.
चाचणी 10 गुणांची होती. तर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी किती गुण मिळवले आहेत ते शोध.

2) 800 च्या किती टक्के म्हणजे 40?

3) एका वर्गात 10 ओळी आहेत. प्रत्येक ओळीमध्ये 16 बेंच आहेत, तर वर्गात किती बेंच आहेत?

a) 120 b) 150 c) 160 d) 130

4) चंद्रावर दिवसाचे तापमान $130^0$ सेल्सियस पर्यंत पोहोचू शकते. रात्रीचे तापमान $-110^0$ सेल्सियस इतके कमी होऊ शकते. उच्च आणि निम्न तापमानात काय फरक आहे?

a) $140^0$ सेल्सियस b) $240^0$ सेल्सियस

c) $130^0$ सेल्सियस d) $110^0$ सेल्सियस फरक:____________________

5) संख्या चढत्या क्रमाने लाव.

321, 672, 311, 145, 437, 821, 988 = ________________________________________

6) शहराची लोकसंख्या 56,67,862 आहे. पुरुषांची संख्या 20,34,123 आणि महिलांची संख्या 20,13,021 आहे, बाकीची मुले आहेत तर शहरातील मुलांची एकूण संख्या शोध.

7) शाळेत जाताना आणि येताना राणी रोज चालत जाते. शाळा आणि तिचे घर हे अंतर 975 मी. आहेत. तर तिने 5 दिवसात चाललेले एकूण अंतर शोध.

राणीने एका दिवसात चाललेले अंतर = ________ मी


तिने 5 दिवसात चाललेले अंतर = ________ मी

8) $\frac{7}{100}$ हे दशांश अपूर्णांकात कसे लिहशील.

a) 7.0 b) 0.07 c) 0.7

Date:____/____/____

9) उदाहरण सोडवून माकडाला केळीपर्यंत पोहोचण्यास मदत कर.




10) रिकाम्या जागा भर.

a) 100g आणि 10 kg मधील वजन जास्त कोणाचे आहे?


b) अर्धा किलो ग्रॅम__________ = किती ग्रॅम

**घटकावर आधारित प्रश्न**

1) 1 चित्र 5 वाहने. वाहनांची संख्या चित्रालेखामध्ये लिही.

| वाहनाचा प्रकार | वाहने | संख्या |
|---|---|---|
| सायकल |  | |
| स्कूटर |  | |
| रिक्षा |  | |
| बैलगाडी |  | |

खालील आलेखाचे निरिक्षण कर आणि प्रश्नांची उत्तरे लिही. (प्रश्न 2 ते 5)




2) सर्वांत जास्त तापमान कोणत्या शहराचे आहे?

उत्तर:____________________

3) कमाल तापमान समान असणारी शहरे कोणती ?

उत्तर:____________________

Date: ___/___/___

4) कोणत्या शहरांचे कमाल तापमान 30 अंश सेल्सिअस आहे?

उत्तर: ______________________________

5) पाचगणी आणि चंद्रपूर या शहरांच्या कमाल तापमानातील फरक किती ?

उत्तर = ______________________________

6) एका रोपवाटिकेतील रोपांची माहिती खाली दिली आहे. ही माहिती स्तंभालेख काढ.

| रोपांची नावे | मोगरा | जाई | जास्वंद | शेवंती |
|---|---|---|---|---|
| रोपांची संख्या | 70 | 50 | 45 | 80 |

7) एका गावातील काही कुटुंबप्रमुखांची नावे व त्यांच्या कुटुंबातील एका दिवसातील पिण्याच्या पाण्याचा वापर दिला आहे. दिलेल्या माहितीवरून स्तंभालेख काढ. (प्रमाण: Y अक्षावर: 1 सेमी 10 लीटर पाणी)

| नाव | रमेश | शोभा | अयूब | ज्यूली | राहुल |
|---|---|---|---|---|---|
| पिण्याचा पाण्याचा वापर | 70 लीटर | 60 लीटर | 40 लीटर | 40 लीटर | 55 लीटर |

8) एका प्राणिसंग्रहालयातील प्राणी व प्राण्यांची संख्या पुढे दर्शवल्याप्रमाणे आहे. दिलेल्या माहितीवरून स्तंभालेख काढ. (प्रमाण : Y अक्षावर, 1 सेमी 4 प्राणी)

| प्राणी | हरीण | वाघ | माकड | ससा | मोर |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | 20 | 4 | 12 | 16 | 8 |

9) सांगली जिल्ह्यातील 5 गावांमध्ये विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. या माहितीच्या आधारे स्तंभालेख काढ. (प्रमाण : Y अक्षावर, 1 सेमी = 100 झाडे)

| गावाचे नाव | दुधगाव | बांगणी | समडोळी | आष्टा | कवठेपिरान |
|---|---|---|---|---|---|
| वृक्षारोपन केलेल्या झाडांची संख्या | 500 | 350 | 600 | 420 | 540 |

10) तुझ्या चार वर्गमित्रांची नावे लिही. प्रत्येक नावाच्या बाजूला, त्याचे व तिचे वजन किलोग्रॅममध्ये लिही. ही माहीती सारणीत भर आणि स्तंभालेख काढ.

Date:___/___/___

## स्वयं चाचणी

1) एका आठवड्यात कारखान्यामध्ये तयार झालेल्या मनगटी घड्याळांची संख्या खालीलप्रमाणे आहे. माहिती चित्रालेखाच्या माध्यमातून मांड आणि योग्य प्रमाणाची निवड कर.

| दिवस | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| घड्याळे | 300 | 350 | 250 | 400 | 300 | 275 |


2) माहिती चित्रालेखाच्या माध्यमातून मांड आणि योग्य प्रमाणाची निवड कर.काही प्राण्यांचे आयुष्य खालील प्रमाणे दिले आहे. ही माहिती दर्शविणारा आडवा स्तंभालेख काढ.

| प्राणी | उंट | अस्वल | कुत्रा | मांजर | बैल | गाय | गाढव | हत्ती | शेळी | घोडा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वयोमान | 50 | 40 | 22 | 25 | 28 | 22 | 45 | 70 | 15 | 10 |

Date: ___/___/___

3) वर्ग आणि विद्यार्थी संख्येवरुन खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

वर्गनिहाय विद्यार्थी संख्या 1 एकक = 10 विद्यार्थी




1) इयत्ता X किती विद्यार्थी आहेत?

_______________________________

2) इयत्ता VII किती विद्यार्थी आहेत?

_______________________________

3) इयत्ता IX किती विद्यार्थी आहेत?

_______________________________

4) सरपंच निवडणुकीत विविध उमेदवारांना मिळालेली मते खालील तक्त्यामध्ये त्यांच्या चिन्हां खाली दर्शविली आहेत.

| चिन्हे |  |  |  |  |
|---|---|---|---|---|
| मिळालेली मते | 400 | 550 | 350 | 200 |

a) कोणत्या चिन्हाला सर्वात कमी मते मिळाली? ______________

b) कोणत्या चिन्हाचा उमेदवार निवडणूक जिंकला ? ______________

5) एका दिवशी वेगवेगळ्या कंपन्यांच्या टेलिव्हिजन संचाची विक्री खाली दिलेल्या चित्रात दाखवली आहे. (प्रमाण  **= 5 टेलिव्हिजन संच)**

| कंपनी | टेलिव्हिजन संच |
|---|---|
| A |  |
| B |  |
| C |  |
| D |  |
| E |  |

a) कोणत्या कंपनीचे टेलिव्हिजन संच लोकांना अधिक आवडले?

उत्तर: ______________________

b) कोणत्या कंपनीचे 15 टेलिव्हिजन संच विकले गेले आहेत?

उत्तर: ______________________

c) कोणत्या कंपनीचे सर्वात कमी टेलिव्हिजन संच विकले गेले आहेत?


उत्तर: ______________________

Date: ___/___/___


# सममिती

**उजळणी**


1) डावीकडील आकृतीमध्ये प्रत्येक चौकोनामध्ये विशिष्ट आकृतीबंध दाखविला आहे. तर, रिकाम्या चौकोनात उजवीकडे दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय योग्य असेल त्यावर बरोबरची ☑ खूण कर.



2) डावीकडील आकृतीमध्ये प्रत्येक चौकोनामध्ये विशिष्ट आकृतीबंध दाखविला आहे. तर, रिकाम्या चौकोनात उजवीकडे दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय योग्य असेल त्यावर बरोबरची ☑ खूण कर.



3) क्रमाने येणारा पुढचा आकार कोणता असेल?




उत्तर: ____________________

4) चेहऱ्याचा आकार पूर्ण कर.





5) खालील टीपके जोड आणि कोणताही एक आकार तयार कर.



6) शब्दाची आरशातील प्रतिमा काढ. AMMA     उत्तर: ____________________


7) आकार पूर्ण कर.






Date:___/___/___

8) डावीकडील आकृतीत रिकाम्या जागेत बसणाऱ्या योग्य पर्यायावर बरोबरची ☑ खूण कर.




9) क्रमाने येणारा पुढचा योग्य पर्याय कोणता असेल?



10) क्रमाने येणाऱ्या आकाराचा पुढचा योग्य पर्याय ओळख ?



Date:___/___/___


## घटकावर आधारित प्रश्न

1) प्रतीबिंब सममिती अक्ष म्हणजे काय ?

______________________________________________


______________________________________________

2) खालिल आकृत्यांचे सममिती अक्ष काढ.




3) 5 इंग्रजी कॅपिटल अक्षरे लिही. त्यांचे सममिती अक्ष काढण्याचा प्रयत्न कर.



4) खाली दिलेल्या आकृत्यांच्या दुसऱ्या बाजूला '' ही सममितीचा अक्ष होईल अशा पध्दतीने आकृती काढून सममितीय आकृत्या पूर्ण कर.





5) खालिल अक्षरे ही ______________ सममिती अक्षाची उदाहरणे आहेत.




6) खाली दिलेल्या आकृत्यांमध्ये सममिती अक्षांची संख्या लिही.


 ______________  ______________

 ______________  ______________

Date: ___/___/___


7) आरशात तुला कोणत्या प्रकारची सममिती दिसते. ____________________

8) खालील आकृती सममितीय आहे की नाही ते लिही.



उत्तर: ____________________

9) खाली दिलेल्या आकृतीच्या सममिती अक्षांची एकूण संख्या लिहा.




उत्तर: ____________________

## स्वयं चाचणी

1) आरशातील प्रतिमेमध्ये देखील तसाच दिसणारा शब्द लिही. (उदा.: WOW)

**उत्तर** = ____________________

2) दिलेली आकृती सममितीय आहे की नाही.




उत्तर: ____________________


3) सममितीय प्रतिमांचे अर्धवट राहिलेले भाग काढ.




4) खालील ठिपक्यांचा वापर करुन सममितीय प्रतिमा काढ.



5) ठिपक्यांचा वापर करुन अर्धवट राहिलेला
आकार पूर्ण कर.








6) आरशातील प्रतिमेतही सारख्याच दिसणाऱ्या आकारांना बरोबरची खुण कर.

A H F W T K Z B Z

7) खाली काही आकार दिलेले आहेत. त्यापैकी कोणता सममितीय आकार आहे?

1) 


2) 


3) 


उत्तर: ____________________


8) आकार पूर्ण कर.







9) आकार पूर्ण कर आणि पक्षाला नाव दे.



उत्तर: ____________________

10) समिमीती अक्ष काढ.



उत्तर: ____________________

Date:____/____/____

# विभाज्यता

## उजळणी


1) 5 + 5 + 5 + 5 + 5 + 5 = ______ x 5 रिकाम्या जागेवरची संख्या

(a) 5 (b) 6 (c) 7 (d) 10

2) रिकाम्या जागेवरची संख्या शोध.

8, 16, ____, 32, ____, 48, 56, ____, ____, 80

3) उदाहरणे सोडवून सापाचे पोट भर.




4) दिलेल्या संख्यांची बेरीज शोध.

| | | | |
|---|---|---|---|
| | 2 | 8 | 3 |
| + | 2 | 4 | 1 |
| | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1 | 0 | 0 | 0 |
| + | 3 | 3 | 3 | 0 |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1 | 5 | 5 | 5 |
| + | 2 | 3 | 3 | 2 |
| | | | | |

5) अचूक उत्तर शोध.

| | | |
|---|---|---|
| 3 | 3 | 3 |
| - | 4 | 1 |
| | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 5 | 0 | 0 |
| - | 3 | 3 | 0 |
| | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | 7 | 7 | 7 |
| - | 2 | 1 | 2 |
| | | | |

6) जर एका पेटीमध्ये 16 पेन्सिल्स असतील, तर अशाच प्रकारच्या 12 पेट्यांमध्ये किती पेन्सिल्स असतील?

7) शेवटच्या गोलात कोणती संख्या येईल? (45) + (35) = ( )

8) संख्यांची बेरीज कर आणि रिकाम्या चौकोनात कोणती संख्या येईल ते शोध.

[ ]

[276] + [522]

Date:___/___/___

## घटकावर आधारित प्रश्न

1) खालील संख्या वाचा. त्यांपैकी कोणत्या संख्या 2 ने, 5 ने किंवा 10 ने विभाज्य आहेत ते आळखून रिकाम्या चौकटींत लिहा.

125, 364, 475, 750, 800, 628, 206, 508, 7009, 5345, 8710

| 2 ने विभाज्य | 5 ने विभाज्य | 10 ने विभाज्य |
|---|---|---|
| | | |

2) उदाहरणाचे निरिक्षण करुन सारणी पूर्ण कर.

| संख्या | संख्येतील अंकांची बेरीज किती? | बेरजेला 3 ने भाग जातो का? | दिलेली संख्या 3 ने विभाज्य आहे का? |
|---|---|---|---|
| 63 | 6 +3 = 9 | ✓ | ✓ |
| 872 | 17 | X | X |
| 91 | | | |
| 552 | | | |
| 9336 | | | |
| 4527 | | | |

3) उदाहरणाचे निरिक्षण करुन सारणी पूर्ण कर.

| संख्या | दिलेल्या संख्येला 4 ने भागून पाहा. पूर्ण भाग जातो का ? | दशक व एकक स्थानच्या अंकांनी तयार झालेली संख्या | तयार झालेली संख्या 4 ने विभाज्य आहे का ? |
|---|---|---|---|
| 992 | ✓ | 92 | ✓ |
| 7314 | | | |
| 6448 | | | |
| 8116 | | | |
| 7773 | | | |
| 3024 | | | |


4) उदाहरणाचे निरिक्षण करुन सारणी पूर्ण कर.


| संख्या | दिलेल्या संख्येला 9 ने भागून पाहा. पूर्ण भाग जातो का ? | संख्येतील अंकांची बेरीज | बेरीज 9 ने विभाज्य आहे का ? |
|---|---|---|---|
| 1980 | ✓ | 1 + 9 + 8 + 0 = 18 | ✓ |
| 2999 | X | 29 | X |
| 5004 | | | |
| 13389 | | | |
| 7578 | | | |
| 69993 | | | |


Date:___/___/___


5) जर कोणत्याही संख्येमधील अंकांच्या बेरजेला 9 ने निःशेष भाग जात असेल, तर ती ________ संख्या______ने विभाज्य असते.

6) काही झाडांमध्ये संख्या दिलेल्या आहेत. 3, 4, 9 ने भाग जाणाऱ्या संख्या तपासून घे आणि खाली दिलेल्या टोपल्यांमध्ये संख्या लिही.








7) 3 ची विभाज्यतेची कसोटी लिही.

8) 4 ची विभाज्यतेची कसोटी लिही.

9) 10 ची विभाज्यतेची कसोटी लिही.

Date: ___/___/___

## स्वयं चाचणी

1) 24 ÷ 2 हे ________ ला समान आहे. खालील पर्यायांमधून निवड.

(a) 3 x 2 (b) 6 x 2 (c) 4 x 2 (d) 4 x 4

2) जर संख्या 2 ने विभाज्य जात असेल तर ती संख्या आहे.

(a) विषम संख्या b) सम संख्या (c) ओळखता येत नाही

3) खालीलपैकी कोणत्या संख्येला 6 ने भाग जातो?

(a) 955 (b) 552 (c) 671 (d) 877

4) अचूक संख्यांनी चौकोन भर.

| 500 | ÷ 5 | | ÷ 2 | | ÷ 2 | | ÷ 5 | | x 10 | | x 2 | | x 5 | 500 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

5) रिकाम्या जागेवरची संख्या शोध.

(a) 98 ÷ _____ = 49 (b) _____ ÷ 5 = 10 (c) 808 ÷ _____ = 101

6) जर 64 चॉकलेट्स आणि 8 मुले असतील. तर, मुलांमध्ये चॉकलेट्स सारख्या कशा वाटून घेता येतील ?

7) खालीलपैकी कोणती संख्यांना 2 ने विभाज्य आहेत. 2 ने विभाज्य असतील तर बरोबर (✓) ची आणि विभाज्य नसतील चुक (x) अशी खुण कर.

(a) 3242 (b) 3263 (c) 984 (d) 45

8) 5462 ही संख्या 2,3 आणि 6 या संख्यांनी विभाज्य आहे का? होय/ नाही.

9) राधाने तिच्या 3 मित्रांसाठी 15 पेन विकत घेतले आणि तिला ते सर्वांना समान वाटायचे आहेत. तर, प्रत्येक मित्राला किती पेन मिळतील?

एकूण पेन = ☐ मित्रांची संख्या = ☐ प्रत्येकाला पेन मिळतील = ☐

10) अचूक उत्तर शोध. 12 x 10 ÷ 5 = ________

(a) 24 (b) 60 (c) 120 (d) 50

Date: ____/____/____

## लसावि मसावि

**उजळणी**

1) राजु एका दिवसात 5 पुस्तके पूर्ण वाचतो, तर 30 दिवसात तो किती पुस्तके वाचू शकेल?

2) वर्गात 50 विद्यार्थी आहेत. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना समान अशा पध्दतीने 250 पुस्तकांचे वाटप केले तर प्रत्येक विद्यार्थ्याला किती पुस्तके मिळाली असतील ?

3) खालील उदाहरणांची बेरीज शोध.

(a) 231 + 401 = ________________ (b) 300 + 003 = ________________

4) संख्यांची बेरीज कर आणि रिकाम्या चौकोनात कोणती संख्या येईल ते शोध?

255 + 310 = ________________

5) 28 X 12 याचे अचूक उत्तर खालील पर्यायांमधून निवड.

(a) 412 (b) 336 (c) 516 (d) 166

6) खालील उदाहरणातील बाकी आणि भागाकार लिही.

(a) 542 ÷ 7_________ बाकी_________भागाकार

(b) 405 ÷ 5_________ बाकी_________भागाकार

(c) 782 ÷ 3_________ बाकी_________भागाकार

7) 24 ÷ 2 हे_________ला समान आहे. खालील पर्यायांमधून निवड.

(a) 3 x 2 (b) 6 x 2 (c) 4 x 2 (d) 4 x 4


8) जर संख्या 2 ने विभाज्य असेल तर ती संख्या ______________ आहे.

(a) विषम संख्या (b) सम संख्या (c) ओळखता येत नाही

9) रिकाम्या जागेवरची संख्या ओळख.

(a) 98 ÷ _____ = 49 (b) _____ ÷ 5 = 10 (c) 808 ÷ _____ = 101

10) उदाहरण सोडवून माकडाला झाडापर्यंत पोहोचण्यास मदत कर.




**घटकावर आधारित प्रश्न**

1) खालील उदाहरणांतील संख्यांचे सर्व विभाजक लिही.

a) 12, 16 ______________________________

b) 21, 24 ______________________________

c) 25, 30 ______________________________

d) 24, 25 ______________________________

2) खालील संख्यांचा मसावि काढा.

a) 45, 30  b) 16, 48  c) 48, 54  d) 150, 225

3) 18 मीटर लांब व 15 मीटर रुंद जमिनीच्या तुकड्यात भाजीपाला लावण्यासाठी मोठ्यात मोठ्या आकारांचे चौरसाकृती सारखे वाफे तयार करायचे झाल्यास प्रत्येक वाफा जास्तीत जास्त किती मीटर लांबीचा असावा?

4) 8 मीटर आणि 12 मीटर लांबीच्या प्रत्येक दोरखंडांचे सारख्या लांबीचे तुकडे करायचे आहेत, तर अशा प्रत्येक तुकड्याची लांबी जास्तीत जास्त किती मीटर असावी?

5) 13 आणि 6 चा लसावि काढ.

6) दोन संख्यांचा लसावि हा त्यांच्या गुणाकारापेक्षा मोठा असू शकत नाही. (चूक की बरोबर)
उत्तर: ____________________

7) खालील संख्यांचे लसावि काढ.

a) 9, 15

b) 2, 3, 5

c) 12, 28

d) 15, 20

8) कवायतीसाठी पटांगणावरील मुलांच्या प्रत्येक रांगेत 20 मुले किंवा प्रत्येक रांगेत 25 मुले राहतील अशा रांगा केल्यास, रांगा पूर्ण होतात व एकही मुलगा शिल्लक राहत नाही, तर त्या शाळेत कमीत कमी किती मुले आहेत?

9) वीणाजवळ काही मणी आहेत. तिला समान मणी असलेल्या माळा तयार करायच्या आहेत. तिने 16, 24 किंवा 40 मण्यांच्या माळा केल्या तर एकही मणी शिल्लक राहत नाही, तर तिच्याजवळ कमीत कमी किती मणी आहेत ?

10) $\frac{13}{45}$ व $\frac{22}{75}$ या व्यवहारी अपूर्णांकांचे सममूल्य समच्छेद अपूर्णांक शोधा व त्यांची बेरीज कर.

Date: ___/___/____

**स्वयं चाचणी**

1) 12, 16, आणि 28 चा मसावि काढ.

2) खालीलपैकी 5 आणि 10 ने विभाज्य असलेल्या संख्या कोणत्या ते शोध.


25, 125, 250, 1250, 10205, 70985, 45880

उत्तर: ____________________

3) 147 च्या विभाजकांना गोल कर. 2 3 4 5 6 7 8 9 10

4) 5 + 5 + 5 + 5 + 5 + 5 = _______ x 5 रिकाम्या जागेवरची संख्या = _______

5) एका भांड्यात 990 मिली रस असतो. जर तुम्ही 9 ग्लासमध्ये 100 मिली रस ओतला, तर जारमध्ये किती रस शिल्लक राहील?



उत्तर: ____________________

6) 56 आणि 52 यांचा गुणाकार काय येईल ?

उत्तर: ____________________

7) 80 चे विभाजक शोध.

उत्तर: ____________________

Date: ___/___/___

8) खालील संख्यांचे लसावि काढ.

(a) 84 112 196

(b) 102 119 153

9)100 ते 200 मधील 8 ने विभाज्य असलेल्या संख्या लिही.

Sivasri Charitable Trust

+91 80 26629890
info@sikshana.org
www.sikshana.org
# 41, K. R. Road, Basavangudi
Bengaluru – 560004, Karnataka